# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

**परिपत्रक**

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/परिपत्रक/2020/ 746
दिनांक:- 18 FEB 2020

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,
पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- आपल्या शैक्षणिक संस्थेमधील विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययनवर्ग सुरू होण्यापुर्वी, विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीताचे गायन करण्याबाबत.

संदर्भ:- उच्च व तंत्रशिक्षण विभाग म.रा., मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-2020/प्र.क्र.60/ विशि-3, दि. 15 फेब्रुवारी 2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, राज्यातील तंत्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभावना जागृत ठेवण्याच्या दृष्ट्रीने महाविद्यालय व तंत्रनिकेतनांमध्ये विद्यार्थ्यांनी दैनंदिन अध्ययनवर्ग सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत गायन करावे याबाबत संदर्भिय परिपत्रक शासनाने आदेश निर्गमित केलेले आहे (प्रत संलग्न)

तसेच स्नेह संमेलने, वर्धापन दिन, समारोप समारंभ, सामुहिक उपक्रम, चर्चासत्र, शिबीर, विविध विषयांबाबतचे परिसंवाद, वादविवाद स्पर्धा इत्यादी आयोजन कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीत गायनाने करण्यात यावी.

आपणास कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांनी दैनंदिन अध्ययनवर्ग सुरू होण्यापूर्वी व कुठल्याही कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रगीत गायन करून करावी व त्याबाबतचा दैनंदिन अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. सर्व शैक्षणिक संस्थांकडून सदरहू शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे याबाबतची खबरदारी सर्व प्राचार्य यांनी घ्यावी.

सहपत्र:- संदर्भिय शासन परिपत्रक

(डॉ. राम निबुदे)
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. 2अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

Scanned by CamScanner